विजय संधान, पुणे.

□ दाक्षिणात्य अभिनेता रंजनने *चंद्रलेखा* व *निशा* शिवाय आणखी कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?

— *मंगला*, *सिंदबाद द सेलार*, *बापबेटी*, *बागी सिपाही*, *रॉयल मेल*, *शहेनशहा*, *खिलाडी* यासारख्या काही चित्रपटात रंजन नायकाच्या भूमिकेत चमकला. आणि त्यानंतर *राम बलराम*, *चैताली*, *चोर चोर* या चित्रपटात चरित्र भूमिकेत.

आशा भगवानराव पाठक, पाली.

□ *इन्कार*मधील 'मुंगळा, मुंगळा' हे गाणे कोणी गायलेय? तसेच *क्रोध* या चित्रपटातील प्रमुख खलनायकाची भूमिका कोणी केलीय?

— *इन्कार*मधील 'मुंगळा, मुंगळा' हे गाणे उषा मंगेशकरने गायले आहे. *क्रोध*मध्ये प्रमुख खलनायकाची भूमिका करणारा नट कै. यशवंत दत्त.

योगिता पाटील, ठाकुर्ली

□ भारतीय चित्रपटात सर्कसचा उपयोग सर्वात प्रथम कोणत्या चित्रपटात करण्यात आला?

— १९४८च्या जेमिनीच्या *चंद्रलेखा* या चित्रपटात.

गौरी सावंत, उल्हासनगर.

□ दिलीपकुमारची पहिली नायिका कोण? त्याने कोणत्या अभिनेत्रीबरोबर सर्वात जास्त चित्रपटात भूमिका केल्या?

— बॉम्बे टॉकीजचा *ज्वारभाटा* हा दिलीपकुमारची भूमिका असलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात मृदुला त्याची नायिका होती. तिचा देखील हा पहिलाच चित्रपट होता. नरगिस व वैजयंतीमाला या दोघींच्याबरोबर तो सर्वात अधिक चित्रपटात चमकला. *अंदाज*, *अनोखा प्यार*, *दीदार*, *जोगन*, *बाबुल* व *हलचल* या सात चित्रपटात नरगिसबरोबर तर *देवदास*, *नया दौर*, *पैगाम*, *लीडर*, *मधुमती*, *गंगा जमना*, *संघर्ष* या सात चित्रपटात वैजयंतीमालाबरोबर.

प्रमोद दौलत कदम, तासगांव.

□ यश चोप्रांनी आत्तापर्यंत दिग्दर्शित केलेले चित्रपट कोणते?

— *धूल का फूल*, *धर्मपुत्र*, *वक्त*, *आदमी और इन्सान*, *इत्तेफाक*, *दाग जोशिला*, *दीवार*, *कभी कभी*, *त्रिशूल*, *काला पत्थर*, *सिलसिला*, *मशाल*, *फासले*, *विजय*, *चांदणी*, *लम्हें*, *परंपरा*, *डर*, *दिल तो पागल है*.

संदीप खोपडे, पुणे.

□ असे कोणकोणते गायक गायिका आहेत की ज्यांनी चित्रपटात नायक नायिकेची भूमिका केली आहे?

— पार्श्वगायनाचा जमाना सुरू झाल्यानंतर पार्श्वगायक म्हणून आपल्या रूपेरी जीवनाची सुरूवात करून नंतर नायक बनलेले अभिनेते म्हणजे मुकेश, किशोरकुमार, तलत, सी. एच. आत्मा, शैलेंद्र सिंह गायिकात फक्त सुलक्षणा पंडितच पार्श्वगायिका म्हणून आपल्या रूपेरी जीवनाची सुरूवात करून नंतर नायिका बनली.

यश बैकरे, कल्याण.

□ प्राणने कोणत्या चित्रपटात सर्वात प्रथम खलनायकाची भूमिका केली?

— १९४८च्या बॉम्बे टॉकीजच्या *जिद्दी* या चित्रपटात.

एस. एस. बाणवेले, मंचर.

□ चित्रपट विषयक शिक्षण देणाऱ्या किती संस्था आहेत?

— संस्था अनेक आहेत पण त्यातील अधिकृत व विश्वासार्ह संस्था एकच पुण्याची फिल्म अँड टेलिव्हीजन इन्स्टिट्युट.

मीना मावळे, नारायणगांव, पुणे.

□ लता मंगेशकर यांच्या आधी चित्रपट व्यवसायात कोणकोणत्या पार्श्वगायिका होत्या? त्यातील सर्वश्रेष्ठ पार्श्वगायिका कोण?

— पारूल घोष, अमीरबाई कर्नाटकी, शमशाद बेगम, राजकुमारी, जोहराबाई, अंबालावाली, झीनत बेगम, सरस्वती राणे, ललिता देऊळकर, सितारा कानपुरी, ललिता परूळेकर, कल्याणी या लताबाईंच्या आधीच्या आपल्या चित्रपटातील लोकप्रिय पार्श्वगायिका. त्या आपापल्या परीने श्रेष्ठ होत्या. या गायिकांपैकी अमीरबाई, शमशाद, राजकुमारी यांनी लताबाईंच्या उदयानंतर त्यांच्याबरोबर देखील गाणी गायली.

कल्पना वरूणकर, खारेपाटण.

□ कोणत्या भारतीय चित्रपटात सर्वात प्रथम इंग्रजी गाणे आले? या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक कोण?



कुंकू चित्रपटात शांता आपटे व शकुंतला

— प्रभातच्या *कुंकू* तथा *दुनिया ना माने* या चित्रपटात शांता आपटेंनी गायलेले आपल्या चित्रपटातील पहिले इंग्रजी गाणे. केशवराव भोळे या चित्रपटाचे संगीतकार होते.

प्रताप परशुराम कोळी, वरेडी, कोळीवाडा.

□ रंजनाचा पहिला चित्रपट कोणता? अशोक सराफबरोबर ती कोणकोणत्या चित्रपटात चमकली?

— *चंदनाची चोळी, अंग अंग जाळी* हा रंजनाची भूमिका असलेला पहिला चित्रपट. *बाईलवेडा*, *गोंधळात गोंधळ*, *दैवत*, *एक डाव भूताचा*, *गल्ली ते दिल्ली*, *बायको असावी अशी*, *गुपचुप गुपचुप*, *सासू वरचढ जावई*, *बहुरूपी*, *बिनकामाचा नवरा*, *कुलस्वामिनी अंबाबाई*, *खिचडी* या चित्रपटात अशोक सराफ व रंजना नायक नायिका म्हणून एकत्र चमकले. याशिवाय *लक्ष्मी*, *सासुरवाशीण*, *सुशीला*, *दुनिया करी सलाम*, *हळदी कुंकू*, *हीच खरी दौलत*, *सुळावरची पोळी*, *अरे संसार संसार*, *नागीण*, *देवघर* या चित्रपटात देखील ते एकत्र होतेच. पण नायक-नायिका नव्हते.

संतोष हालकुडे, कुर्डुवाडी.

□ चित्रपटात पशु व पक्षी यांच्याकडून काम करून घेताना कोणाची मदत घेतात?

— त्यांच्या ट्रेनरची.

विजेता प्रश्न

अशोक परशुराम परब, ए/१०२, तळमजला, श्री साई दत्तगुरू अपार्टमेंट, पाटीलवाडी, सावरकर नगर, ठाणे (पश्चिम) -४००६०६.

□ अमिताभ बच्चनचा एकही संवाद नसलेला चित्रपट कोणता?

— *रेश्मा और शेरा*. अमिताभची या चित्रपटातील भूमिका मुक्याची होती.